■ वर्ष-०७ ■ अंक-२० ■ मुंबई, मंगळवार ०६ ते १२ एप्रिल २०२१ ■ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

You Tube

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक ● सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

PG 2
लग्नाचे आमीष दाखवून महिलेवर अत्याचार; उद्योजकाविरुद्ध गुन्हा दाखल

3 → सूनेवर होती सासऱ्याची वाईट नजर; मुलाने दिली हत्येची सुपारी

घरात सुरु होती लग्नाची तयारी, पेट्रोल अंगावर ओतून तरुणाला जिवंत पेटवलं ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## पोलिसांच्या लाचखोरीच्या डायरीत नोंदी?



मुंबई : दक्षिण मुंबईतील 'सोशल क्लब'मधील धाडीत हाती लागलेल्या डायरीत मुख्य आरोपी सचिन वाझे यांच्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांबाबत माहिती पुढे आल्याचा दावा 'राष्ट्रीय तपास यंत्रणे'ने के ला

...पान २ वर...

## मुंबईत आतापर्यंतची सर्वाधिक रुग्णवाढ



मुंबई : मुंबईमधील रुग्णवाढीने रविवारी नवा उच्चांक गाठला असून रविवारी तब्बल ११ हजार १६३ मुंबईकरांना करोनाची बाधा झाली. तर २५ रुग्णांचा मृत्यू

...पान २ वर...

# गरजेएवढ्याच कामगारांना कामावर बोलवा

## करोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमी वर मुख्यमंत्र्यांनी दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख उद्योजकांसमवेत संवाद साधला.



मुंबई : मुंबईतील करोनाचा राज्यातील वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता उद्योगजगताने काही कालावधीसाठी कारखान्यांमध्ये आवश्यकतेनुसारच कामगारांना कामावर बोलवावे. प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उद्योगांना त्यांच्या कारखान्याच्या आवारातच कामगारांची राहण्याची व्यवस्था करणे शक्य आहे ती त्यांनी करावी, घरातूनच काम (वर्क फ्रॉम होम) करणे शक्य आहे तिथे ते केले जावे, जो कामगार करोनाबाधित होईल त्या कामगाराच्या कुटुंबाची जबाबदारी उद्योगांनी घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी उद्योगांना के ले. त्यावर सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही उद्योगजगताने दिली. करोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमी वर मुख्यमंत्र्यांनी दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख उद्योजकांसमवेत संवाद साधला. अनर्थ रोखायचा तर अर्थचक्र बाधित होते आणि अर्थचक्र सुरू ठेवायचे तर अनर्थ होतो, या कात्रीत आपण सापडलो असून या संकटकाळात मित्र होऊन सोबत राहणे महत्त्वाचे असते. राज्यातील उद्योगजगताने नेहमीच मित्रत्वाच्या भावनेने शासनास आतापर्यंत मदत केली आहे, सहकार्य केले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे कमी आहेत, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, जिंदाल उद्योग समूहाने पुढे येऊन ऑक्सिजनच्या पुरवठ्यासाठी शासनाला सहकार्याची भूमिका घेतली आहे. बाबा कल्याणी यांनी व्हेंटिलेटर्सची निर्मितीच नाही तर ते वापरण्याचे प्रशिक्षण आरोग्य कर्मचारी आणि तंत्रज्ञांना देण्याची तयारीही दाखवली आहे. ही मदत अमूल्य आहे. काही उद्योजकांनी त्यांच्या कामगारांच्या लसीकरणाची जबाबदारी घेण्याचीही तयारी दाखवली आहे. आपण सगळ्यांचे लसीकरण वेगाने करण्याचा प्रयत्न करत आहोत अशी माहिती या वेळी मुख्यमंत्र्यांनी दिली मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देताना उद्योगजगत शासन आणि मुख्यमंत्री यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे आणि राहील अशी ग्वाही उपस्थितांनी दिली. सध्या लोकांचा जीव वाचवण्याला प्राधान्य असल्याने शासन जो निर्णय घेईल त्याला सहकार्य करण्याची उद्योगजगताची तयारी असल्याचे उपस्थितांनी सांगितले. त्यांनी आठवड्याचे सातही दिवस आणि २४ तास लसीकरण व्हावे, करोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे, निंबधांचे पालन न करणाऱ्यांना कडक दंड लावावा, शिस्तबद्ध वर्तणूक राहील यासाठी कडक नियमावली तयार करावी, लोकांचा रोजगार सुरू राहील हे पाहावे, जिथे शक्य आहे तिथे घरून काम करण्याच्या सूचना द्याव्यात, अशा विविध अपेक्षा या वेळी उद्योजकांनी व्यक्त के ल्या. बाबा कल्याणी, उदय कोटक, अजय पिरामल, सज्जन जिंदाल, हर्ष गोयंका, निखिल मेसवानी, अशोक हिंदुजा, निरंजन हिरानंदानी, अपूर्व भट्टाचार्य, बोमन इराणी, राजीव रस्तोगी, संजीव बजाज, मनदीप मोरे, इशान गोयल, अमित कल्याणी, अपूर्व

...पान २ वर...

## अनिल देशमुख यांनी दिला गृहमंत्रीपदाचा राजीनामा



ठाकरे सरकारमधील आणखी मंत्र्याने राजीनामा दिला आहे. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे वादात सापडलेले गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. परमबीर सिंह यांनी देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपये वसुलीचे टार्गेट दिल्याचा आरोप केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआयला चौकशीचे आदेश दिल्यानंतर अनिल देशमुख यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन त्यांना माहिती दिली. त्यानंतर आता मुख्यमंत्र्यांकडे राजीनामा सुपूर्द करणार आहेत. राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नबाव मलिक यांनी याची माहिती दिली. "मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला अनिल देशमुखही उपस्थित होते. देशमुख यांनी पवारांकडे राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त

...पान २ वर...

## अनाळा सागरी पोलीसांची अवैध हातभ■ दारुच्या धंद्यावर धडक कारवाई ; सहा हातभ■ दारु केल्या उध्दवस्त





पालघर येथील अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेहेश शैटये याना दिनांक-३/०४/२०२१ रोजी गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमी वरून सकाळी ०६-०० ते १४-३० वाजताच्या दरम्यान अर्नाळा किल्ला ता.वसई जि.पालघर येथे हातभट्टी दारू बनविणारे इसमावर अचानक छापा मारून हातभट्टी दारू बनविण्याचा चॉश,गावठी दारू काळा गुळ असा एकुण ३,१८,५००/- रूपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला.

आरोपी विरुद्ध एकुण सहा गुन्हे नोंद करण्यात आले.

...पान २ वर...

## अमली पदार्थची विक्री करणारा आरोपी गजाआड



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि. २९/०३/२०२१ रोजी गुन्हे शाखा कक्ष -२ शाहुराज रणवरे यांना विश्वसनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार एक इसम वसई पुर्व चिंचोटी ब्रिजच्या जवळ गांजा नावाचा अंमली पदार्थ विक्री करत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने चिंचोटी ब्रीजजवळील पेट्रोल पंपाजवळ पोलीस स्टाफसह सापळा रचून २३.३० वाजताचे सुमारास इसम नामे अशोक गणेश गायकवाड रा. कोथाडी पाडा, चिंचोटी, ता.वसई जि.पालघर हा त्याचे ताब्यात १,००,०००/- रु किंमतीचा ५ किलो २०० ग्रॅम गांजा नावाचा अंमलीपादार्थ जवळ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आला आहे.सदर इसमास ताब्यात घेऊन त्याचेविरुद्ध पोलीस हवालदार. रमेश अधिकराव भोसले नेम गुन्हे शाखा – २ वसई युनीट मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनीसरकार तर्फे फिर्याद दिली असुन त्याबाबत वालीव पो.स्टे. गु.र.क्र. ३३७/२०२१ एनडीपीएस. ॲक्ट कलम ८(क), २२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. राजेंद्र देशमुख सहा पो.आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, श्री शाहुराज रणवरे, पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा -२, सपोनि/सुहास कांबळे, सफौ./महादेव वेदपाठक, पो.हवा./मंगेश चव्हाण,आणि पथक यांनी केली आहे

## गृहमंत्र्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर संजय राऊत यांनी दिली प्रतिक्रिया



मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केलेल्या गंभीर आरोपांची सीबीआय चौकशी होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावरील आरोपांची प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश सीबीआयला दिले आहेत. यावर माध्यमांशी बोलताना खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करावा लागेल, असं राऊत म्हणाले आहेत. तसेच, या देशातील कोणतीही तपासयंत्रणा म्हणजे परमेश्वराचा अवतार नसतो, असं देखील त्यांनी बोलून दाखवलं आहे. माध्यमांशी बोलताना शिवसेना खासदार संजय राऊत म्हणाले, "मी एवढंच सांगेन प्रकरण थोडं राजकीय देखील आहे, या देशातील कोणतीही तपासयंत्रणा म्हणजे परमेश्वराचा अवतार नसतो. तपास हा त्या त्या पद्धतीने होत असतो. काल ममता बॅनर्जींनी देखील केंद्रीय तपास यंत्रणेबाबत काही टिप्पणी केली आहे, अन्यजण देखील करतात. पण शेवटी आपण न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयासमोर मान झुकवतो व आदर करतो." तसेच, "न्यायालयाच्या संपूर्ण निकालाचा अभ्यास करावा लागेल. सरकारला एक विधी व न्याय खातं असतं. जे काय निकालपत्र आहे, त्याबाबत सरकार अभ्यास करेल. माझा काही व्यक्तीशा संबंध नाही. महाविकासआघाडी म्हणून म्हणाल तर शेवटी या संपूर्ण निकाल पत्राबाबत सरकारच्यावतीनेच मत व्यक्त केलं

...पान २ वर...

## पोलीस बळ कमी असल्याने जनतेने सहकार्य करावे- पोलीस आयुक्त हेमंत नगराळे



राज्यासह मुंबईत कोरोनाबाधितांची संख्या झपाट्याने वाढत आहे. यातच मुंबईत कोरोना संसर्ग रोखण्यासाठी मुंबई पालिका आणि मुंबई पोलीसांनी कंबर कसली आहे. यातच राज्यात कोरोना निर्बंध आता अधिक कडक करण्यात आले आहे. याचपार्श्वभूमीवर मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांनी पोलीस बळ कमी असल्याने जनतेने सहकार्य करावे असे आवाहन केले आहे. एबीपी माझा वृत्त वाहिनीशी बोलताना त्यांनी हे आवाहन केले आहे.

यावेळी बोलताना मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे म्हणाले की,

...पान २ वर...

## आरपीएफ जवानांनी 12 महिन्यांत 141 पळून आलेल्या मुलांची केली सुटका



मुंबई विभागातील रेल्वे संरक्षण दलाने (आरपीएफ) मागील १२ महिन्यांत मुंबईतील मध्य रेल्वेवरील स्थानकांच्या रेल्वे प्लॅटफॉर्मवरून आत्तापपर्यंत १४१ मुलांना वाचवले आहे. या मुलांना त्यांच्या पालकांच्या हाती सुखरूप

...पान २ वर...

# मुंबई पोलिसांकडून शहरात जमावबंदीचा आदेश जाहीर



महामारी कायदा १८९७ अन्वये तसेच महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ न्वये एका जाहीर परिपत्रकानुसार ४ मार्च रोजी मार्गदर्शके जाहीर करण्यात आली होती. त्यामध्ये राज्यातील कोरोनाचा वाढता प्रसार पाहता, संपूर्ण राज्यात आपत्कालीन अशा स्वरूपाचे प्रतिबंधात्मक उपाय हे ४ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत जाहीर करण्यात आले. याच आधारे मुंबई पोलिसांकडून मुंबई शहरामध्ये क्रिमिनल प्रोसिजर कोड, (सीपीसी) १९७३ अन्वये कलम १४४ न्वये जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहे. राज्यातील

...पान २ वर...

## लग्नाचे आमीष दाखवून महिलेवर अत्याचार; उद्योजकाविरुद्ध गुन्हा दाखल




लग्नाचे आमीष दाखवून महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी उद्योजकाविरुद्ध सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतिक सिद्दीक मोतीवाला असे या उद्योजकाचे नाव आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, ही महिला २०१४ ते २०१६ या काळात सतीश मोटर्समध्ये कामाला होती. त्यादरम्यान, तिची ओळख अतिक मोतीवाला यांच्याशी झाली होती. या ओळखीतून त्यांनी ५ एप्रिल २०१५ रोजी तिच्यावर अत्याचार केला. पीडिता पोलिसांकडे जात असताना, त्यांनी तिला लग्नाचे आमीष दाखवले. त्यानंतरही त्यांनी तिच्यावर अनेक वेळा अत्याचार केला. तसेच, तिच्याकडून पैसे घेतले आणि परत दिले नाहीत. त्यांचे लग्न झाले असून, त्यांना मुले असल्याचे समजल्यानंतर ही महिला २०१८मध्ये सुरतला परतली. त्यानंतर, फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत, त्यांनी तिला परत बोलावले. पुढे २९ नोव्हेंबर २०२० रोजीही तिच्यावर अत्याचार केला. या प्रकारामुळे पीडिता घाबरलेली होती. त्यामुळे तिने राज्य महिला आयोगाकडे तक्रार दिली होती. या तक्रारीवरून सातारा पोलिस ठाण्यात शनिवारी (३ एप्रिल) गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास उपनिरीक्षक अनिता फसाटे या करत आहेत.

## पोलीस ठाण्यातच हल्लेखोराने केले ब्लेडने सपासप वार



एकमेकांविरोधात वारंवार तक्रार करणाऱ्या दोघांना प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पोलिसांनी बोलावले खरे, मात्र वाद मिटण्याऐवजी अधिकच गंभीर झाला. एका आरोपीने पोलिसांसमोरच दुसऱ्यावर ब्लेडने वार केले. त्यामुळे ठाणे अंमलदार कक्षातच एक जण रक्तबंबाळ झाला. पोलिसांनी हल्लेखोराला ताब्यात घेतले, तर जखमीला उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

नगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात ही घटना घडली. आरोपी राजू मुरलीधर काळोखे याने साहेबराव काते यांच्यावर हल्ला केला. काते जखमी झाले असून पोलिसांनी काळोखे याला खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात ताब्यात घेतले.

या घटनेबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काळोखे व काते यांच्यात पैशांवरून वाद आहेत. शुक्रवारी दुपारी काळोखे आणि काते यांच्यात वाद झाले होते. त्यावेळी हा वाद पोलीस ठाण्यात आला. पोलिसांनी दोघांच्याही तक्रारी घेऊन परस्परविरोधी गुन्हे दाखल केले. मात्र, प्रकरण मिटण्याची चिन्हे नव्हती. त्यामुळे शनिवारी तोफखाना पोलिसांनी या दोघांनाही प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पोलीस ठाण्यात बोलावले. तेथे दोघेही समोरासमोर आल्यावर वाद पुन्हा चिघळला. पोलीस ठाण्यातील ठाणे अंमलदार कक्षात यासंबंधीचे कामकाज सुरू होते. बाचाबाची आणि दमबाजी वाढत जाऊन काळोखे याने सोबत आणलल्या ब्लेडने काते याच्यावर वार केले. यामध्ये काते जखमी झाले. पोलिसांनी हस्तक्षेप करेपर्यंत आरोपीने सपासप वार केले. शेवटी पोलिसांनी हल्लेखोर काळोखे याला पकडले. प्रतिबंधात्मक कारवाईचे कामकाज सुरू असताना, पोलीस कागदपत्रे तयार करण्यात व्यस्त असताना अचानक ही घटना घडली. त्यामुळे काही काळ पोलिस ठाण्यात धावपळ उडाली होती.

तोफखाना पोलिसांनी या प्रकरणी कोळोखे याच्याविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. त्याला ताब्यात घेण्यात आले. तर जखमी काते याला उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. या दोघांमध्ये पैशाचा व्यवहार झालेला होता. पैसे वसुलीवरून वाद सुरू होता. हा वाद पोलीस ठाण्यापर्यंत पोहचला.

## संतापजनक! अयोध्येत 4 वर्षांच्या मुलीवर बलात्कार, आरोपी तरुणाला अटक




अयोध्या: उत्तर प्रदेशच्या अयोध्या जिल्ह्यातील रुदौली परिसरातील एका गावात चार वर्षांच्या मुलीवर बलात्कार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. गावातील तरुणानेच हे घृणास्पद कृत्य केले. मुलीची प्रकृती बिघडल्याने तिला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला तात्काळ अटक केली आहे.

पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, चार वर्षांची मुलगी संध्याकाळी उशिरापर्यंत घरासमोर खेळत होती. घटना घडली त्यावेळी आम्ही शेतावर गेलो होतो. त्यावेळी गावातील तरुणाने मुलीला घेऊन गेला. गावाबाहेरील ओढ्याच्या दिशेने नेले. तिथे तिच्यावर अत्याचार केले, असे तिने तक्रारीत म्हटले आहे.

तत्पूर्वी, मुलगी अचानक बेपत्ता झाल्याने गावात खळबळ माजली. कुटुंबीयांसह गावातील लोकही त्या मुलीचा शोध घेत होते. गावाजवळील ओढ्याजवळ मुलगी रडत बसली होती. तिची प्रकृती बिघडली होती. कुटुंबीयांनी तात्काळ पोलिसांत धाव घेतली. पीडितेच्या आईने आरोपीविरोधात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्याला अटकही केली आहे, अशी माहिती रुदौली पोलीस ठाण्याचे प्रमुख राकेश श्रीवास्तव यांनी दिली.

## भररस्त्यात ट्रेलरच्या क्लीनरकडून चालकाची हत्या




गडचिरोली: जिल्ह्यातील धानोरा-येरकड मार्गावर सालेभट्टी गावाजवळ काही तांत्रिक बिघाडामुळे मागील आठवड्यापासून उभ्या असलेल्या एका ट्रेलरच्या चालकाची त्याच्याच सहयोगी क्लीनरने काल दुपारी दोन ते तीन वाजताच्या सुमारास चाकू भोसकून हत्या केली. त्यामुळे परिसरात खळबळ माजली आहे.

ट्रेलरच्या मालकाने बऱ्याच प्रतीक्षेनंतर चालकाच्या बँक खात्यात पैसे टाकले. त्या पैशांच्या मागणीच्या वादाचे पर्यावसन हत्येच्या घटनेत झाले, अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे.

अन्नाराज एम. मारिया मिशेल ( रा.कालकाड, तमिळनाडू) असे मृत चालकाचे नाव असून, पोनमडसामी दशमुर्ती (रा. उत्तीरामुथ्थानपत्ती) असे हत्या करणाऱ्या क्लीनरचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा ट्रेलर मागील सहा ते सात दिवसांपासून तांत्रिक बिघाडामुळे धानोऱ्यापासून साधारणत: पाच किलोमीटर अंतरावर सालेभट्टी गावाजवळ दुरूस्तीच्या प्रतीक्षेत उभा केलेला होता.

ट्रेलरचा चालक आणि क्लीनर दोघेही तिथेच होते. त्यांना पुढे छत्तीसगडला जायचे होते. आठवडाभर एकाच ठिकाणी असल्याने त्यांच्याकडील पैसेही संपले होते.

त्यात ट्रेलरच्या मालकाने चालकाच्या बँक खात्यात १० हजार रुपये जमा केले होते. यातील काही पैसे क्लीनरने मागितल्यावरून वाद सुरू झाला. क्लीनरने चालकावर चाकूने वार केला. यात त्याचा मृत्यू झाला.

चालक चाकू घेऊन अंगावर धावून आला होता. स्वसंरक्षण करताना चाकूहल्ल्यात चालक मारला गेल्याचे आरोपीने सांगितले.

दरम्यान पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन क्लीनरला ताब्यात घेतले असून, चालकाचा मृतदेह विच्छेदनासाठी धानोरा उपजिल्हा रूग्णालयात पाठवला आहे. पुढील तपास धानोरा पोलीस करीत आहेत.

## 'खबरी'च्या संशयातून तरुणाला संपविले




पोलिसांना माहिती पुरवित असल्याच्या संशयातून तरुणाची हत्या करण्यात आली. ही घटना शुक्रवारी संध्याकाळी पावणेसहाच्या सुमारास जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत वसंतशहा मार्ग परिसरात घडली. जितू उर्फ लाँड्री गगरानी (वय ३५, रा. वसंतशहा चौक, जरीपटका) असे मृताचे नाव आहे. राजा नावाचा इसम व अन्य एका जणाने मिळून ही हत्या केल्याचे समोर येत आहे. अवैध दारूविक्री करीत असताना कारवाई करण्यासाठी जितू पोलिसांना माहिती पुरवल्याच्या संशयातून राजाने त्याची हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. राजा हा परिसरात अवैध दारू विकायचा. दोन महिन्यांपूर्वी त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत तो कारागृहात गेला.

त्याचा जामीन कोणीच घेतला नसल्याने दोन महिने त्याला कारागृहात राहावे लागले. ३० मार्चला तो कारागृहाबाहेर आला. आपण अवैध दारू विकत असल्याची माहिती जितूने पोलिसांना पुरवली असावी, असा त्याला संशय होता.

## व्हॉट्सॲप ग्रुपवर पॉर्न व्हिडिओ, आयुक्तांना बदलीची धमकी; सायको अधिकाऱ्याला अटक



इंदूर: मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील आयकर विभागाच्या कार्यालयातून पोलिसांनी एका माथेफिरू अधिकाऱ्याला अटक केली आहे.

एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये महिला कर्मचाऱ्यांविषयी आक्षेपार्ह टीका-टिप्पणी करत होता. तसेच त्या ग्रुपमध्ये तो पॉर्न व्हिडिओ टाकत होता. इतकेच नाही तर विभागाच्या आयुक्तांनाही बदलीची धमकी देत होता. विभागीय तक्रारीनंतर इंदूर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदूरच्या एमजी रोड पोलिसांनी आयकर आयुक्त कार्यालयातील एका कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी कर्मचाऱ्याने व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून त्यात अश्लील व्हिडिओ पोस्ट केले. तसेच आयुक्तांना बदलीची धमकी देत होता. जे लोक ग्रुपमधून लेफ्ट होत होते, त्यांना तो परत ॲड करायचा.

विभागातील कर्मचाऱ्यांनीच अधिकाऱ्याच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. एका अधिकाऱ्याने व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून त्यात सर्व अधिकाऱ्यांना ॲड केले. त्यात महिला कर्मचारीही होत्या. आरोपी त्यात अश्लील व्हिडिओ टाकत होता. तसेच आयुक्तांना धमकावत होता, असे त्यांनी तक्रारीत म्हटले होते.

पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. त्यांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे.

# पृष्ठ १ वरुन

### पोलिसांच्या लाचखोरीच्या

आहे. डायरीत  रकमेसोबत काही पोलीस अधिकारी आणि विभागांच्याही नोंदी आढळल्या आहेत. हा हिशोब मुंबईतील विविध आस्थापनांकडून दरमहा येणाऱ्या हप्त्याचा असावा, असा संशय असून त्याबाबत केंद्रीय अन्वेषण विभाग आणि आयकर विभागाला माहिती दिली जाईल, असेही एनआयएने स्पष्ट के ले आहे. गिरगाव चौपाटीसमोरील एका सोशल क्लबवर छापा घालून एनआयएने शोधाशोध केली होती. तसेच उद्योगपती मुके श अंबानी धमकी आणि व्यावसायिक मनसुख हिरेन हत्या या गुन्ह्यांत वापर झालेल्या सीम कार्डबाबत हाती लागलेल्या माहितीची खातरजमाही के ली. या कारवाईत एनआयएच्या हाती क्लबचालकाने जपून ठेवलेली नोंदवही आढळली. त्यातून हा हिशोब समोर आला आहे. अतिरिक्त सॉलीसीटर जनरल अनील सिंग यांनी शनिवारी या डायरीचा हवाला देत वाझे यांनी मोठी रक्कम स्वीकारल्याचा दावा न्यायालयात के ला. या नोंदवहीत मुंबई पोलीस दलातील काही विभाग, अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. नावांसमोर रक्कम नमूद असून ती दरमहा स्वीकारलेल्या हप्त्याची असावी. या माहितीची शहानिशा के ली जाणार आहे, असे एनआयएतील सूत्रांनी स्पष्ट के ले.याशिवाय वाझे यांच्या निवासस्थानी अज्ञात व्यक्तीचे पारपत्र आढळले असून त्या व्यक्तीची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही सांगण्यात आले. शनिवारी मध्यरात्री एनआयए पथकाने वाझे यांना अंधेरी परिसरात नेले. तेथे त्यांच्याकडे चौकशी करण्यात आली. मनसुख हत्येपूर्वी वाझे आणि पोलीस दलातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याची या भागात बैठक झाल्याची माहिती एनआयएच्या हाती लागली आहे.

### मुंबईत आतापर्यंतची सर्वाधिक रुग्णवाढ

झाला. मुंबईतील रुग्ण वाढीचा दर १.६१ टक्क्यांवर पोहोचला असून रुग्णदुपटीच्या कालावधीत कमालीची घसरण झाली आहे. बाधित रुग्णांच्या शोधार्थ पालिके ने रविवारी ५१ हजारांहून अधिक चाचण्या के ल्या.

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने करोनाबधित रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे राज्य सरकार, पालिका आणि अन्य यंत्रणांनी करोना संसर्गाविरोधात पुन्हा एकदा कंबर कसली आहे.

### अनाळा सागरी पोलीसांची अवैध हातभ...

१) १००/२०२१ मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ फ) प्रमाणे दि.०३/०४/२०२१ रोजी १९.२७

आरोपीत दमयंती नरहरी भोईर रा- म्हाजेवाडी अर्नाळा किल्ला ता-वसई,

२) १०१/२०२१ मुंबई दारुबंदी कायदा कलम ६फ) प्रमाणे दि. ०३/०४/२०२१ रोजी १९.४०

रोजी आरोपीत अशोक मेहेर रा. म्हाजेवाडी अर्नाळा किल्ला ता-वसई, जि-पालघर

३) १०२/२०२१ मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५फ) प्रमाणे दि. ०३/०४/२०२१ रोजी

१९.-४६ रोजी आरोपीत विजय रमेश म्हाजे रा. म्हाजेवाडी अर्नाळा किल्ला ता-वसई,

४) १०३/२०२१ मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५फ) प्रमाणे दि. ०३/०४/२०२१ रोजी १९.५४

रोजी आरोपीत एकनाथ वैती यांचा मुलगा नांव माहित नाही घर नं.१५१ म्हाजेवाडी अर्नाळा किल्ला ता.वसई

५) १०४/२०२१ मुंबई दारुबंदी कायदा कलम ६-फ) प्रमाणे दि. ०३/०४/२०२१ रोजी

२०.०४ रोजी आरोपीत प्रभाकर तुळशीदास धनु वय.४८ रा.अर्नाळा किल्ला

ता-वसई,

६) १०५/२०२१ मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५फ) प्रमाणे दि.०३/०४/२०२१ रोजी २०.१०

रोजी आरोपीत रमेश म्हात्रे रा. म्हाजेवाडी अर्नाळा किल्ला ता-वसई,

सदर कारवाई श्री संजयकुमार पाटील सो पोलीस उप आयुक्त,परीमंडळ-२ मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली, श्री चंद्रकांत जाधव सहा.पोलीस आयुक्त नालासोपारा विभाग, तसेच महेश शेटये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अमरसिंह पाटील, पोलीस निरीक्षक, पो.उपनिरी/चांगदेव कोळेकर व पथक यांनी केली आहे.

### अनिल देशमुख यांनी दिला

केली. त्यावर शरद पवार यांनी होकार दिला. देशमुख यांनी पवारांकडे राजीनामा दिला असून, आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भेटीला ते निघाले आहेत. मुख्यमंत्र्यांना भेटून ते त्यांच्या पदाचा राजीनामा देणार आहेत," अशी माहिती राष्ट्रवादीचे प्रवक्ते आणि राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी दिली आहे.अनिल देशमुख यांनी राजीनाम्यात काय म्हटलं आहे? "मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्याकडे ॲड. जयश्री पाटील यांच्याद्वारे दाखल केलेल्या याचिकेमध्ये आज ५ एप्रिल २०२१ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये त्यांच्या तक्रार अर्जावर सीबीआय मार्फत प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश पारित केलेले आहेत.

### गरजेएवढ्याच कामगारांना कामावर बोलवा

देशपांडे, जफर खान, राजेंद्र गाडवे, आनंद गांधी, सिद्धार्थ जैन आदी उद्योजक सहभागी झाले होते. चित्रपट, मालिका निर्मात्यांशी चर्चा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी करोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमी वर चित्रपट व टीव्ही मालिका निर्माते यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे चर्चा करून शासन लागू करीत असलेल्या र्निबधांबाबत सहकार्य करावे, असे आवाहन केले. निर्मात्यांनी आपल्या विविध सूचना मांडून शासन घेईल, त्या निर्णयांना एकजुटीने पाठिंबा असेल, असे आश्वासन दिले. या बैठकीत महेश भट, सुषमा शिरोमणी, मेघराज राजेभोसले, मनोज जोशी, सुबोध भावे, डॉ. अमोल कोल्हे, सिद्धार्थ रॉय कपूर, अमित बहेल, निखिल साने, दीपक राजाध्यक्ष, अजय भाळवणकर, टी. पी. अग्रवाल, सतीश राजवाडे, संग्राम शिर्के, अशोक दुबे, नितीन वैद्य, अशोक पंडित, अभिषेक रेगे, दीपक धर आदी सहभागी झाले होते.

### आरपीएफ जवानांनी 12

सोपवण्यात आले आहे. एप्रिल २०२० ते मार्च २०२१ पर्यंत मुंबई विभागातील रेल्वे संरक्षण दलाने १४१ मुलांची सुटका केली असून त्यात मुंबईच्या मध्य रेल्वेवरील रेल्वे स्थानकांमधील ९२ मुले आणि ४९ मुलींचा समावेश आहे आणि चाइल्डलाइन सारख्या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने त्यांच्या पालकांशी पुन्हा भेट घडवून देण्यात आली. मागील पाच वर्षांत म्हणजेच २०१६ पासून ३१ मार्च २०२१ पर्यंत, मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात १,८७४ मुलांना वाचविण्यात आले.

### पोलीस बळ कमी असल्याने जनतेने

आपल्याकडे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अंमलबजावणी संस्थ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे सामान्य नागरिक या लॉकडाऊनच्या आदेशाचे स्वत:हून पालन करणार नाहीत तसेच आपल्या कुटुंबियांना सांगणार नाहीत तोपर्यंत हा लॉकडाऊन परिणामकारक ठरणार नाही. आरोग्य सेवा मर्यादित आहे. तसेच अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी वर्ग हा देखील मर्यादित आहे. त्यामुळे मागच्या काही दिवसांपासून कोरोना संसर्ग ज्या दुपटीने पसरतोय ही खूप गंभीर समस्या आहे. जर येणाऱ्या काही दिवसांमध्ये आपण यावर अंकुश ठेवला नाही तर परिस्थिती हाताबाहेर जाईल. यासाठीच शासनाने हा लॉकडाऊन नागरिकांवर लादला आहे.

### गृहमंत्र्यांबाबत मुंबई उच्च

पाहिजे. मला वाटतं मुख्यमंत्र्यांपर्यंत हा विषय गेला असेल आणि त्या संदर्भात तेच बोलतील किंवा त्यांच्यावतीने कोणीतरी बोलेल. पूर्ण निकाल काय आहे तो अजून मी पाहिलेला नाही. मीडियाच्या माध्यामातून जी काही माहिती मला मिळालेली आहे. त्यावर विसंबून राहून कोणतीही प्रतिक्रिया मला देता येणार नाही. कारण जो काही असेल तो उच्च न्यायालयाचा निर्णय आहे आणि प्रकरण न्यायप्रविष्ट असेल अशाप्रकारे तर त्याचा संपूर्ण अभ्यास करायला हवा. कोणतंही मत व्यक्त करणं आणि निर्णय घेणं सरकारने किंवा कोणत्या राजकीय पक्षानं हे योग्य नाही." असंही यावेळी राऊत यांनी सांगितलं.

### मुंबई पोलिसांकडून शहरात

कोरोनाचे संकट पाहता कोरोनाच्या महामारीचा धोका, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीनेच हे जमावबंदीचे आदेश राज्यात लागू करण्यात आले आहेत. जमावबंदीच्या आदेशान्वये मुंबई पोलिसांच्या हद्दीतील क्षेत्रात सोशल डिस्टन्सिंगचे नियम पालन करणे अनिवार्य असेल. त्यामध्ये दोन व्यक्तींमध्ये सहा फुटांचे अंतर ठेवणे, चेहरा कव्हर करणे यासारख्या नियमांचे पालन करणे महत्वाचे असणार आहे. त्यासोबतच मुंबईत रात्रीच्या वेळेत कर्फ्युचाही आदेश मुंबई पोलिसांकडून जाहीर करण्यात आला आहे.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, ०६ ते १२ एप्रिल २०२१


संपादकीय...



## विदाव्यवधान : 'मेटाडेटा' संकलनाचे (गैर)फायदे..

जीपीएस तंत्रज्ञानाच्या आधारे अक्षांश-रेखांशासकट मिळवलेला 'मेटाडेटा' संबंधित व्यक्तीच्या आवडीनिवडी, राजकीय मते, धार्मिक श्रद्धा या अत्यंत खासगी गोष्टी जाणून घेण्यासाठी कसा काय उपयुक्त ठरतो?

२० एप्रिल २०११ रोजी 'द न्यू यॉर्क टाइम्स', 'द वॉशिंग्टन पोस्ट', 'द वॉल स्ट्रीट जर्नल'सारख्या आघाडीच्या दैनिकांमध्ये एक बातमी प्रसिद्ध झाली, जिने जगभरातील स्मार्टफोन वापरकर्त्यांची झोप उडवली. अलास्डेअर ॲलन आणि पीट वॉर्डन या दोन ब्रिटिश संशोधकांना अकस्मात लागलेल्या शोधाचा हवाला देत दिलेल्या त्या बातमीचा मथळा होता :

'सावधान! ॲपल तुमच्या दैनंदिन व्यवहारांवर नजर ठेवून आहे!' त्यानंतर पुढील अनेक आठवडे ॲपलची विदा-व्यवस्थापन पद्धती व त्यामुळे वापरकर्त्यांच्या खासगीपणाच्या हक्कावर होणारा अधिक्षेप यावर माध्यमातून उलटसुलट चर्चा होत राहिली.

ॲलन त्या वेळेस इंग्लंडमधल्या एक्सेटर विद्यापीठात संगणकीय नकाशे बनविण्याच्या



प्रणालींवर संशोधन करत होता, तर वॉर्डन हा 'ओ'रायली' प्रकाशन संस्थेचा संगणक-तंत्रज्ञान विषयांवर लिहिणारा एक प्रमुख लेखक होता. त्याचबरोबर तो 'ओपनहीटमॅप' या भौगोलिक विदेचे चित्रात्मक विश्लेषण करणाऱ्या ओपन सोर्स प्रणालीची निर्मिती करण्यातही गुंतला होता.

'हीटमॅप' हा दृश्यात्मक आलेखाचा एक प्रकार आहे, ज्यात एखाद्या विशिष्ट विषयाचे किंवा प्रश्नाचे विश्लेषण हे सर्वसाधारण तक्त्यांचा वापर करून करण्याऐवजी रंगांच्या कमीअधिक तीव्रतेच्या छटांचा वापर करून करतात. उदाहरणार्थ, भारतातील करोना संसर्गाची तीव्रता जाणून घेण्यासाठी जिल्हानिहाय आकडेवारी एका तक्त्यात भरून देण्यापेक्षा हीटमॅप वापरून देता येईल.

यामध्ये मुंबई-पुण्यासारख्या जिल्ह्य़ांमधला अतितीव्र संसर्ग दाखवण्यासाठी गडद लाल रंगाचा वापर करता येईल, जयपूरसारख्या मध्यम संसर्ग असलेल्या भागांसाठी पिवळ्या रंगाच्या छटांचा वापर करता येईल, तर अरुणाचल प्रदेशासारख्या नगण्य संसर्ग असलेल्या जागा हिरव्या रंगाने रंगवता येतील. थोडक्यात, एखाद्या विषयाचे विश्लेषण उपलब्ध विदेच्या साहाय्याने कमी वेळात, पण प्रभावीपणे हीटमॅपच्या आधाराने करता येते.

संगणकीय नकाशे व त्यात उपलब्ध असलेल्या विदेचे विश्लेषण हा ॲलन आणि वॉर्डन या दोघांचाही अभ्यासाचा विषय असल्यामुळे या विषयासंबंधातील विविध व्यासपीठांवर होणाऱ्या चर्चामध्ये या दोघांची ओळख झाली. ॲपल आयफोनमधल्या 'ॲपल मॅप' या जीपीएस (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम) तंत्रज्ञानाधारित दिशादर्शक उपयोजनाचा (ॲप) अभ्यास करताना त्यांना ॲपल फोनमध्ये 'कन्सॉलिडेटेड.डीबी' नावाची एक फाइल सापडली. त्या फाइलचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यांना संशयास्पद अशा दोन गोष्टी आढळल्या, ज्या वापरकर्त्यांच्या गोपनीय विदेच्या सुरक्षेप्रति ॲपलला असलेल्या गांभीर्याबाबत शंका उत्पन्न करायला पुरेशा होत्या.

पहिली गोष्ट म्हणजे, त्या फाइलमध्ये वापरकर्त्यांची स्थळ-काळविषयक असलेली विस्तृत माहिती! गेले जवळपास एक वर्ष वापरकर्ता कोणत्या दिवशी कोणत्या ठिकाणी गेला, तिथे साधारण केवढा वेळ त्याने व्यतीत केला, याची अक्षांश-रेखांशासकट अत्यंत अचूक अशा विदेची नोंद त्या फाइलमध्ये होत होती. वर्षभरातील माझ्या दिनक्रमाचा एक हीटमॅप त्या फाइलमध्ये (माझ्या नकळत) तयार होत होता.

ॲपल आपल्या दैनंदिन व्यवहारांवर पाळत तर ठेवत नसेल ना, अशी रास्त शंका ॲलन आणि वॉर्डन यांना आली.

दुसरी आणि त्याहूनही गंभीर गोष्ट म्हणजे, ती फाइल 'अन-एन्क्रिप्टेड' स्वरूपातच फोनवर साठवली जात होती. म्हणजेच त्या फाइलमधली विदा सांकेतिक लिपीत कूटबद्ध स्वरूपात साठवली जात नव्हती, ज्यामुळे त्या माहितीचे आकलन करणे हे कोणालाही सहज शक्य होते. थोडक्यात, एवढय़ा खासगी विदेची सुरक्षितता वाऱ्यावर सोडण्यात आलेली होती.

ॲलन आणि वॉर्डन यांनी आपल्या शोधाची जाहीर वाच्यता केल्यानंतर सुरुवातीचा काही काळ ॲपलने गोपनीयतेच्या या उघड उल्लंघनावर कोणतेही भाष्य करणे टाळले.

कालौघात हा विषय विस्मृतीत जाईल अशी ॲपलची अटकळ असावी, पण ब्रिटिश आणि अमेरिकी माध्यमांनी हा विषय धसास लावणे सोडले नाही. हळूहळू जनमत आपल्या विरोधात जाईल अशी शक्यता जाणवू लागल्यानंतर मात्र ॲपलला काही गोष्टींचा खुलासा करणे भाग पडले. प्रथमत: ॲपलने फाइल 'एन्क्रिप्ट' न करण्याची 'अनवधानाने' झालेली आपली घोडचूक मान्य केली.

# करोना किरकिरवंत!

गतवर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी अवघ्या चार तासांच्या मुदतीवर धडाकेबाजपणे देशभर टाळेबंदी जाहीर करते झाले, तेव्हा ज्यांच्या तोंडून एक शब्दही फुटला नाही तीच मंडळी आता टाळेबंदीमुळे रोजगारावर गदा येते हे ज्ञान पाजळणार, यास काय म्हणावे?

'द क्राऊन' या मालिकेत एक प्रसंग आहे. वडिलांच्या निधनामुळे ग्रेट ब्रिटनच्या सम्राज्ञीपदाचा मुकुट अकस्मात शिरावर धारण करायची वेळ जिच्यावर आली, त्या दुसऱ्या एलिझाबेथच्या आयुष्यात तो घडतो. आपल्यापेक्षा लायक, तडफदार व्यक्ती आसपास आहेत आणि तरीही ग्रेट ब्रिटनचे नेतृत्व करावयाची वेळ आपल्यावर आली आहे याची नम्र, पण अत्यंत ठाम जाणीव असलेल्या या सम्राज्ञीस आपल्या बहिणीसह अनेकांचा दुस्वास सहन करावा लागतो. विन्स्टन चर्चिलसारखा पंतप्रधान तीस गुंडाळू पाहतो. पण या द्वेषाचे, असहकार्याचे पाणी जेव्हा डोक्यावरून जाऊ लागते तेव्हा ही तरुण, अननुभवी सम्राज्ञी अत्यंत संयतपणे आपले पती ड्य़ुक ऑफ एडिंबरा यांच्यामार्फत आसपासच्यांना सुनावते : महाराज्ञीपदासाठी माझ्यापेक्षा पात्र, गुणसंपन्न अनेक व्यक्ती आसपास आहेत, याची जाणीव मला आहे. तरीही सम्राज्ञीपदाचा मुकुट काही योगायोगाने असेल, पण माझ्या शिरावर आहे; तेव्हा तुम्हास आवडो न आवडो, अंतिम निर्णयाधिकार माझाच असेल!

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या करोना-हाताळणीबाबत विरोधक मंडळींची जी आगपाखड सुरू आहे ती पाहिल्यावर 'द क्राऊन' या मालिकेतील हा प्रसंग स्मरतो. महाराष्ट्रातील अलीकडचे आपले किती राजकारणी असले काही किती उदात्त पाहतात, वाचतात वा अनुभवतात हा प्रश्न असला, तरी या मंडळींनी या प्रसंगासाठी तरी ही 'गोल्डन ग्लोब' पुरस्कारप्राप्त आणि ऑस्करलायक मालिका जरूर पाहावी. सत्ता हातून गेल्याची त्यांची जळजळ काही प्रमाणात त्यामुळे कमी होईल. त्याची गरज आहे. याचे कारण संभाव्य सरसकट टाळेबंदीबाबत यातील अनेकांनी सुरू केलेली आगपाखड. ''कोणत्याही परिस्थितीत आम्ही टाळेबंदी लागू करू देणार नाही,'' अशी भीमगर्जना आपापले मतदारसंघही राखता न येणाऱ्या यातील काहींनी केली. त्यांच्या या मर्दमराठा बाणेदारपणाचे कौतुक. पण आपल्या या कथित 'स्वाभिमान'चा किंचितसा अंश त्यांनी गतसाली २४ मार्च वा त्यानंतर वर्षभरात एकदा- अगदी खासगीतसुद्धा- जरी दाखवला असता तरी महाराष्ट्र त्यांना कुर्निसात करता. पण तसे काही केल्याचे दिसले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी अवघ्या चार तासांच्या मुदतीवर धडाकेबाजपणे देशभर टाळेबंदी जाहीर करते झाले, तेव्हा यातील काही किरकिऱ्या कोकणवीरांच्या वा पचपचीत पुणेकर नेत्यांच्या तोंडातून एक शब्दही फुटला नाही, हा इतिहास आहे आणि तो साऱ्या महाराष्ट्राने अनुभवलेला आहे. करोनावर टाळेबंदी हा उपाय नाही याचा साक्षात्कार त्यानंतरच्या जवळपास १२ महिन्यांत- गेल्या वर्षभरात या मंडळींना एकदाही झाला नाही आणि झाला असला तरी तो व्यक्त करण्याची यांची शामत नाही. स्वपक्षीच्या शीर्षस्थ नेत्यांसमोर (म्हणजे दोनच) यातल्या अनेकांना बसणे सोडाच, पण कोणी उभेही करीत नाही. आणि आता हे टाळेबंदीमुळे रोजगारावर गदा येते हे ज्ञान आपणासमोर पाजळणार, यास काय म्हणावे?

गतसाली देशात टाळेबंदी लादली गेली तेव्हा देशभरात करोनाचे शंभरभर रुग्णदेखील नव्हते. आजमितीस एकटय़ा महाराष्ट्राची रुग्णसंख्या चार लाखांहून अधिक आहे. यावर हे महान नेते आणि त्यांचे समाजमाध्यमी अंधभक्त हे रुग्णवाढ रोखण्यातील महाराष्ट्राचे अपयश असे म्हणू शकतात. तसे असेल तर मग मध्य प्रदेश वा गुजरात या राज्यांचे काय? आज देशातील एकूण रुग्णसंख्येतून महाराष्ट्र वगळला तरीही होत असलेली करोना रुग्णवाढ प्रचंड आहे. करोनाने गुजरातचे मुख्यमंत्री रूपानी तर व्यासपीठावरच कोसळले आणि मध्य प्रदेशचे शिवराजसिंह चौहान यांच्यावर मंडईत जाऊन मुखपट्टय़ा वाटायची वेळ आली. ते त्या राज्यांतील भाजप सरकारांचे अपयश मानायचे काय? याचे उत्तर 'नाहीच' हवे.

करोना विषाणू नेत्याची छाती आणि कार्यक्षमता लक्षात घेऊन पसरत नाही. तेव्हा महाराष्ट्रातील अवस्थेबाबत या मंडळींचा राजकीय थयथयाट निर्थक आणि तितकाच निरुपयोगी. तो करणाऱ्यांच्या सत्ता गेल्याच्या दु:खात महाराष्ट्र सहभागी असेलही. पण त्यांची ती आग करोनावर राजकारण करून शमणारी नाही. यातील अनेकांचा नामोल्लेख येथे करावा इतकेही ते दखलपात्र नाहीत. पण त्या राजकारणाची दखल घ्यावी लागते, कारण त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असलेला माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पाठिंबा. या लहानखुऱ्या नेत्यांपासून फडणवीस यांनी स्वत:ला दूर ठेवायला हवे. फडणवीस यांच्या आधाराने हे नेते मोठे होणे असंभव. पण त्यातून फडणवीस लहान होण्याचा धोका मात्र निश्चित दिसतो. तेव्हा झाली तेवढी शोभा पुरे. बेफाट करोनाने आधीच बेजार आणि



बेसहारा झालेल्या मराठी जनांसमोर या मंडळींनी आपल्या राजकीय क्षुद्रतेचे अधिक प्रदर्शन करू नये.

या पार्श्वभूमी वर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी घेतलेला निर्णय संतुलित ठरतो. वाढत्या करोना रुग्णसंख्येमुळे त्यांच्या सरकारने पुन्हा एकदा सरसकट, सर्व दिवस टाळेबंदीचाच मार्ग पत्करला असता तर ती केंद्राने गेल्या वर्षी केलेल्या चुकीची पुनरावृत्ती ठरली असती. तूर्त तरी त्यांनी ती टाळलेली दिसते. पंतप्रधानांनी त्या वेळी एक दिवसाची जनता टाळेबंदी जाहीर करतानाही करोनाची साखळी तुटेल असा दावा केला होता. त्याचे फोलपण 'लोकसत्ता'ने त्याही वेळी दाखवून दिले होते. आता ते अनेकांना पटेल. केंद्राच्या टाळेबंदीमुळे त्यानंतर काय काय झाले हे नव्याने सांगण्याची गरज नाही. टाळेबंदी हा करोनावरील इलाज असता तर जगातून नाही तरी किमान भारतातून तरी करोना एव्हाना हद्दपार होता. कारण जगातील सर्वात कठोर, खडतर टाळेबंदी भारताने अनुभवली. पण त्यानंतरही करोना होता तसाच टवटवीत आहे. विकसित असो वा आपल्यासारखे अर्धविकसित. एकाही देशात टाळेबंदीने करोनाचे संक्रमण थांबलेले नाही. अशा परिस्थितीत त्याच्याशी दोन हात करणे आणि ते करण्याइतके प्रशासन सजग ठेवणे हाच एक मार्ग. हे एका दिवसात वा वर्षांतही होणारे नाही. याच्या जोडीला दुसरा पर्याय आहे तो लसीकरणाचा वेग आणि आवाका वाढवण्याचा. टाळेबंदीविरोधात वल्गना करणाऱ्या या विरोधक मंडळींनी केंद्रासमोर जाण्याचे धाष्टर्य़ दाखवून महाराष्ट्रात तरी लसीकरणाचा वेग कसा वाढेल यासाठी प्रयत्न करावेत. त्यासाठी त्यांनी आपली पत खर्च करावी. तथापि लसीकरणाच्या परिणामकारकतेसदेखील किमान ४५ ते ७१ दिवसांचा अवधी आवश्यक. तोपर्यंत तगून कसे राहायचे, हा प्रश्न.


त्याचे उत्तर आज कोणाकडे नाही. क्रिकेटमधील एक तत्त्व असे की, चांगल्या फलंदाजाने प्रत्येक चेंडू खेळण्याचा हव्यास धरायचा नसतो. काही चेंडू मान तुकवून सोडून द्यायचे असतात. करोनाने निदान याची जाणीव करून दिली असेल. त्यामुळे आता तरी 'करोनावर मात', 'करोनायोद्धे' वगैरे पोकळ भाषा बंद करायला हवी. जे करोनाग्रस्त आहेत त्यांना आवश्यक वैद्यकीय मदत, ज्यांना अद्याप हा विषाणूस्पर्श झालेला नाही त्यांच्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय आणि जास्तीत जास्त लसीकरण ही त्रिसूत्री हा आणि हाच करोनापासून वाचण्याचा उपाय आहे. या विषयावर राजकारण करू पाहणाऱ्यांनी या तीनही पर्यायांच्या अंमलबजावणीत नागरिकांस मदत करावी. आपले कार्यकर्ते आणि समाजमाध्यमी टोळभैरव यांना आभासी जगातून वास्तवात आणावे आणि करोना साथीपासून बचावार्थ नागरिकांच्या सहकार्यास जुंपावे.

तसे करवून घेण्यास पुढाकार मात्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचाच हवा. गेले काही दिवस मुख्यमंत्री समाजातील विविध घटकांशी चर्चा करीत आहेत. ते योग्यच. या चर्चेत त्यांनी आपल्या राजकीय विरोधकांना सामावून घ्यावे.

सर्व माध्यमे याची उत्तम दखल घेतील. अशा चर्चेतून यातील काही बोलघेवडे, पत्रकार परिषदांमुळे आणि या परिषदांपुरतेच जिवंत असलेले विरोधवीर गळून पडतील. उर्वरित नेत्यांच्या सहभागाची एक सल्लागार समिती यातून नेमता येईल आणि तीत देवेंद्र फडणवीस आदींचा समावेश झाल्यास त्यास एक सर्वसमावेशकता येईल. त्यामुळे किमान काही एकमताने साथ-मुकाबला शक्य होईल आणि हे करोना किरकिरवंत शांत होतील. त्यासाठी मार्गदर्शन हवे असल्यास मुख्यमंत्र्यांनीही 'द क्राऊन' पाहावी. अभ्यास आणि मनोरंजन दोन्हीही त्यातून होईल.

## परभणी: डीवायएसपींच्या जीपला अपघात; ठेकेदार, अभियंत्यासह सुपरवायझरविरोधात गुन्हा

परभणी: जिल्ह्यातील पूर्णा ते चुडावा रस्त्यावर नऱ्हापूर येथील पुलाजवळ प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या वाहनाला गुरूवारी पहाटे पावणेचारच्या सुमारास अपघात झाला. या अपघातात प्रभारी उपविभागीय अधिकारी सुभाष राठोड हे जखमी झाले असून, त्यांनी याबाबत रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदार, अभियंत्यासह सुपरवायझर व कामगारांविरोधात चुडावा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले सुभाष राठोड यांच्याकडे पोलीस अधीक्षक जयंत मीना यांनी पूर्णा उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून अतिरिक्त प्रभार दिला आहे.

राठोड हे गुरुवारी रात्री जिल्हा चेकिंग ड्युटी करत होते. यावेळी राठोड हे स्वतःच जीप चालवत होते. त्यावेळी ते पूर्णा ते चुडावा रस्त्यावरून नऱ्हापूर नालापुलाजवळून जात होते. त्यावेळी तेथे पुलाचे काम चालू असल्याने त्या कामाजवळ ठेकेदार, अभियंत्यासह सुपरवायझर यांनीही कोणीही काम चालू आहे, उजवीकडे वळा असा दिशादर्शक फलक लावलेला नाही किंवा रस्त्यावर दगडेही लावलेली नाहीत. त्यामुळे राठोड हे तेथून जात असताना त्यांना नेमका रस्ता लक्षात आला नाही. शिवाय समोरून येणाऱ्या वाहनाच्या प्रकाशदिव्यांमुळे राठोड यांचे जीपवरील नियंत्रण सुटले व जीप नादुरूस्त असलेल्या पुलाजवळ आदळली.

यात जीपचे नुकसान झाले असून, कर्मचारीही जखमी झाला असल्याचे त्यांनी चुडावा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणी चुडावा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास फौजदार पंडीत हे करीत आहेत.

दरम्यान, सुभाष राठोड यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती उत्तम असल्याचे समजते. परभणी जिल्ह्यातील जवळपास सर्वच प्रमुख रस्त्यांची कामे अनेक महिन्यांपासून संथगतीने सुरू असून रहदारीसाठी वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय धुळीमुळे येथून प्रवास करणाऱ्यांना श्वसनाचाही त्रास झाल्याचे अनेक तक्रारी समोर येत आहे.

## सूनेवर होती सासऱ्याची वाईट नजर; मुलाने दिली हत्येची सुपारी

जबलपूर: आपल्या सूनेवर वाईट नजर असलेल्या सासऱ्याची हत्या करण्यात आल्याची घटना मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये घडली. त्याच्या मुलानेच ५० हजारांची सुपारी देऊन त्याची हत्या घडवून आणली. या प्रकरणातील सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

जबलपूरच्या बरगी पोलीस ठाण्यात ही धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

बरगी पोलिसांना २८ मार्च रोजी दुपारी गढ गोरखपूर बीटच्या जंगलात एक अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आल्याची माहिती मिळाली होती. घटनेची माहिती मिळताच, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी तिथे पोहोचले. व्यक्तीची हत्या झाली असून, मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले.या हत्याकांडाच्या तपासासाठी पोलीस अधीक्षकांनी वेगवेगळ्या पथकांची नेमणूक केली. सिवनी जिल्ह्यातील पोलिसांकडूनही या प्रकरणाबाबत माहिती घेतली जात होती. सिवनी जिल्ह्यातील घुंसोर येथील बरोदा येथील ५२ वर्षीय शैल पटेल बेपत्ता असल्याची माहिती मिळाली. बरगी पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी त्याच्या कुटुंबीयांना बोलावले. त्यांनी मृतदेहाची ओळख पटवली.



मृताच्या पत्नीने सांगितले की, २६ तारखेला तिचे पती शैल पटेल यांना आयुष शर्मा उर्फ छोटू आणि मनोज उर्फ पंडा आपल्यासोबत दुचाकीवरून घेऊन गेले होते. त्यानंतर ते परतले नाहीत. पोलिसांनी आयुष आणि मनोजचा शोध घेतला. दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता, या हत्याकांडाचा उलगडा झाला.

शैल पटेल यांची हत्या त्याच्या मुलानेच केली होती, त्यासाठी ५० हजार रुपयांची सुपारी दिल्याची कबुली आरोपींनी दिली. वडिलांची माझ्या पत्नीवर वाइट नजर होती. त्यामुळे त्यांच्या हत्येचा कट रचल्याचे आरोपीने सांगितले. हत्येसाठी गावातीलच प्रमोद पटेल याला ५० हजार रुपयांची सुपारी दिली होती, असेही त्याने सांगितले.

## नोकरीच्या आमिषाने नऊ लाखांना गंडा




पुणे, मल्टिनॅशनल कंपनीत नोकरी लावण्याच्या आमिषाने मुंबईत कार्यरत असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याच्या उच्चशिक्षित पत्नीची सायबर चोरट्यांनी सव्वानऊ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.

धानोरी परिसरातील एका ३७ वर्षीय महिलेने या प्रकरणी फिर्याद दिली. त्यावरून पाच मोबाइलधारक व्यक्तींविरोधात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना एक ते नऊ मार्च या कालावधीत घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे पती पोलिस दलात मुंबई येथे अधिकारी पदावर नेमणुकीस आहेत. त्यामुळे फिर्यादी यांनी मुंबईत नोकरी मिळवण्यासाठी नोकरी विषयक वेबसाइटवर अर्ज केला होता. आरोपींनी फिर्यादींच्या मोबाइलवर संपर्क करून, 'करिअर जॅब्स' कंपनीतून बोलत असून, आमची कंपनी मल्टिनॅशनल कंपनीत नोकरी मिळवून देण्यासाठी कन्सल्टन्सी म्हणून काम करत असल्याचे सांगितले.

चांगली नोकरी देण्याचे आमिष त्यांनी फिर्यादीला दाखवले. त्यानंतर आरोपींनी विविध कारणे सांगून त्यांच्याकडून ११ लाख ६५ हजार रुपये घेतले.

एवढे पैसे दिल्यानंतरही नोकरी मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादींनी आरोपींकडे पैसे मागण्यास सुरुवात केली. तेव्हा आरोपींनी फिर्यादीला दोन लाख ४० हजार रुपये परत केले.

# भारतीय सॉफ्टवेअर इंजिनीअर तरुणाची अमेरिकेत हत्या



भोपाळ: मध्य प्रदेशातील भोपाळच्या ३२ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनीअर तरुणाची अमेरिकेत गोळ्या घालून हत्या करण्यात आली. मागील बुधवारी ही घटना घडली. शरीफ रेहमान असे या तरुणाचे नाव आहे. स्थानिक मीडियाच्या रिपोर्टनुसार, आरोपीचे शरीफच्या मैत्रिणीवर एकतर्फी प्रेम होते. शरीफचा मोठा भाऊ मुकीम याने टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना सांगितले की, माझ्या लहान भावाची सेंट लुइसमध्ये गोळ्या घालून हत्या करण्यात आली. मला केवळ इतकीच माहिती मिळाली आहे. युनिव्हर्सिटी सिटी पोलिसांना याबाबत माहिती घेण्यासाठी फोन केला होता. मात्र, त्यांनी एसओपीचा हवाला देतानाच याबाबत माहिती देण्यास नकार दिला. माध्यमांवरील वृत्ताबाबत शरीफच्या सहकाऱ्यांनीही काहीही माहिती दिली नाही.

शरीफ रेहमान याची आई आणि भाऊ भोपाळच्या सुभाष नगर परिसरात राहतात. शरीफवर अमेरिकेतच अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. शिकागोमध्ये भारतीय राजदूतांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. ते अधिकारीही ज्या कंपनीत शरीफ काम करत होता, त्या कंपनीच्या एचआर प्रमुखाच्या संपर्कात आहेत. कंपनी व्यवस्थापनानेही सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन शरीफच्या कुटुंबीयांना दिले आहे.

गेल्या बुधवारी सॉफ्टवेअर इंजिनीअर शरीफ रेहमान हा युनिव्हर्सिटी सिटी अपार्टमेंटमध्ये जखमी अवस्थेत आढळून आला होता. त्याची मैत्रीणही याच अपार्टमेंटमध्ये राहते. शरीफला उपचारांसाठी रुग्णालयात नेण्यात आले. तिथे त्याचा मृत्यू झाला. युनिव्हर्सिटी सिटी पोलिसांनी या प्रकरणात संशयित कोल जे मिलर याला अटक केली आहे. त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# घरात सुरु होती लग्नाची तयारी, पेट्रोल अंगावर ओतून तरुणाला जिवंत पेटवलं



गोरखपूर : उत्तर प्रदेशातील गोरखपूरमध्ये एक खळबळजनक घटना घडली आहे. एका २२ वर्षीय तरुणाला अनोळखी व्यक्तींनी जिवंत पेटवले. त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच, त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी घटनेची नोंद करून तपास सुरू केला आहे. तरुणाचे लग्न २१ एप्रिलला होणार होते. घरात लग्नाची तयारी सुरू होती. ही घटना घडल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

गोरखपूर जिल्ह्यातील बडहलगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मकरंदपूरमध्ये ही धक्कादायक घटना घडली. मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास अनोळखी लोकांनी राकेश चौरसिया या तरुणावर पेट्रोल ओतले आणि त्याला जिवंत पेटवून दिले. कुटुंबीयांनी त्याला तात्काळ बडहलगंज सीएससीमध्ये दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला डॉक्टरांनी बीआरडी मेडिकल कॉलेजमध्ये नेण्यास सांगितले. तिथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

मृत राकेश चौरसिया याचे वडील हे शेती करतात. त्यांनी सांगितले की, रात्री दोन वाजताच्या सुमारास काही लोक आले. त्यांनी माझ्या मुलाच्या अंगावर पेट्रोल ओतले आणि पेटवून दिले. त्याला तात्काळ रुग्णालयात नेले. मात्र, त्याचा मृत्यू झाला. माझ्या मुलाला पेटवून देऊन त्याची हत्या करणाऱ्याला तशीच शिक्षा द्यायला हवी. घटनेनंतर हल्लेखोरांपैकी एका तरुणाला पळून जात असताना पकडले. पोलिसांच्या ताब्यात दिले. माझ्या मुलाने आरोपी तरुणाला ओळखले. त्यानंतर त्याच्या जबाबाच्या आधारे पोलिसांनी त्याला अटक केली.

मृताचे काका सतीशचंद चौरसिया यांनी सांगितले की, राकेशला काही जणांनी जिवंत पेटवले. राकेशचे २१ एप्रिल रोजी लग्न होणार होते. मध्यरात्री तो झोपला होता.

काही जणांनी त्याच्या अंगावर पेट्रोल ओतून त्याला जिवंत पेटवले. आरोपींना कठोर शिक्षा व्हायला हवी. दरम्यान, काकाच्या तक्रारीनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, चौकशी सुरू आहे.

कुटुंबीयांकडून वेगवेगळी माहिती दिली जात आहे. त्यामुळे हे प्रकरण संशयास्पद आहे. या घटनेची संपूर्ण चौकशी केली जाईल.

शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

# मुलीच्या नावाने सोशल मीडियावर बनावट खाते, अश्लील व्हिडिओ पाठवून द्यायचा धमकी



अमरावती: मुलीच्या नावाने बनावट फेसबुक अकाऊंट तयार करून त्यावर अश्लील मेसेज व अश्लील व्हिडिओ पाठवून सोशल नेटवर्किंग साइटवर अपलोड करण्याची धमकी देणाऱ्या मजनुला सायबर पोलिसांनी शोधून काढले आहे. या संदर्भात ३ मार्च रोजी ब्राम्हणवाडा थडी येथे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली होती. मुलीला तिचे बनावट अकाऊंट तयार करून अश्लील व्हिडिओ व फोटो अपलोड करण्याची धमकी देणाऱ्या युवकावर कलम ३५४ (ड), ५०६ भादंवि सहकलम ६६ (क), ६७, ६७ (अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम १२ बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

ब्राम्हण वाडा थडी पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या घाटलाडकी येथील मजनूला पोलिसांनी जेरबंद केले आहे. पोलीस निरीक्षक तपन कोल्हे, हवालदार सुनील बनसोड,विकास अंजीकर, सागर धापड, रितेश वानखडे यांनी गुन्ह्यामधील आरोपीचा शोध घेण्यासाठी तांत्रिक मदत घेतली. योग्य दिशेने तपास करून आरोपीची ओळख पटवली. नीलेश साहेबराव कुऱ्हाडे (२३, रा. राम मंदिर चौक, घाटलाडकी) असे अटक आरोपीचे नाव आहे. सदर आरोपीस ब्राम्हणवाडा थडी येथील ठाणेदार दीपक वळवी, रविंद्र शिंपी, दिनेश वानखडे, सचिन भुजाडे व सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्त कारवाई करून अटक केली. मोबाइलवर कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या फ्रेंड रिक्वेस्ट किंवा अनोळखी लिंक आल्यास ती स्वीकारू नका तसेच अनोळखी व्यक्तीचे कॉल आल्यास त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती देऊ नये, असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी केले आहे.

# चहा केला नाही म्हणून पतीने दिला तलाक, पत्नीची कोर्टात धाव



गाझियाबाद: उत्तर प्रदेशच्या गाझियाबादमधील लोनी येथे एक तिहेरी तलाकचा प्रकार समोर आला आहे. पत्नीने चहा तयार करून दिला नाही म्हणून पतीने तिला तलाक दिला. पीडितेने वकिलांमार्फत कोर्टात अर्ज दाखल करून न्याय देण्याची विनंती केली आहे.

पीडितेच्या वकिलांच्या माहितीनुसार, लोनी येथील महिलेचे लग्न दहा वर्षांपूर्वी रइसुद्दीन याच्यासोबत झाले होते. त्यांना चार मुले आहेत. रइसुद्दीन हा रिक्षा चालवतो. १३ जानेवारी रोजी त्याने पत्नीला चहा करण्यास सांगितले. मात्र, तिने चहा तयार करण्यास नकार दिला. यावरून दोघांमध्ये वाद झाला. रागाने रइसुद्दीन याने तिला तलाक दिला आणि त्यानंतर रिक्षा घेऊन घराबाहेर निघून गेला.

त्याच दिवशी संध्याकाळी रइसुद्दीन घरी आला. पत्नीने त्याची समजूत काढण्याचा बराच प्रयत्न केला. मात्र, त्याने काहीही ऐकून घेतले नाही. महिलेने त्याच्याविरोधात पोलिसांतही तक्रार दाखल केली. मात्र, पोलिसांनी त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही, असा आरोप आहे. अखेर न्याय मिळावा यासाठी तिने कोर्टाचा दरवाजा ठोठावला आहे.

# नागपूर हादरलं! फ्रेसबुक फ्रेण्डकडून लग्नाचे आमिष दाखवून विद्यार्थिनीवर अत्याचार



फ्रेसबुक फ्रेण्डने लग्नाचे आमिष दाखवून अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीवर अत्याचार केला. ही घटना हुडकेश्वर भागात उघडकीस आली. विद्यार्थिनीने दिलेल्या तक्रारीवरून हुडकेश्वर पोलिसांनी युवक व त्याच्या भावाविरुद्ध अत्याचारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. विक्रम बोंद्रे (वय २१, रा.सिल्ली, ता. तिरोडा, जि.गोंदिया) व त्याचा मामेभाऊ अतुल ,अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

पीडित तरुणी अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. एक महिन्यापूर्वी तिची फेसबुकवर विक्रम याच्यासोबत ओळख झाली. विक्रमने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकविले. लग्नाचे वचन दिले. ३० मार्चला दुपारी तो नागपुरात आला. त्याने विद्यार्थिनीला भेटायला म्हाळगीनगर चौकात बोलाविले. विद्यार्थिनी त्याला भेटायला गेली. यावेळी अतुलही विक्रम याच्यासोबत होता. नातेवाइकांना तुझी भेट घालून देतो,असे म्हणून तो तिला घेऊन मोटारसायकलने तिरोडा येथे गेला. तेथे अतुल याच्या घरी नेले. त्याच्या आई-वडिलांशी भेट घालून दिली. त्यानंतर तो तिला घेऊन लॉजवर गेला. आता आपले लग्न होणार असल्याने त्याने तिला शारीरिक सुखाची मागणी केली. विद्यार्थिनीने नकार दिला. त्याने बळजबरीने तिच्यावर अत्याचार केला. सतत तीन दिवस त्याने लॉजमध्ये विद्यार्थिनीवर अत्याचार केला. दरम्यान, मुलगी बेपत्ता झाल्याने नातेवाइकांनी तिचा शोध सुरू केला.

ती आढळून आली नाही. नातेवाइकाने हुडकेश्वर पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी ती बेपत्ता असल्याची नोंद केली. तीन दिवसानंतर विक्रम याने तरुणीला म्हाळगीनगर चौकात आणून सोडले. ती घरी गेली.आई-वडिलांनी तिला विचारणा केली. विक्रम याने लग्न करणार असल्याचे सांगून नातेवाइकांच्या भेटीसाठी नेल्याचे तिने सांगितले. वडिलांनी मुलीसह हुडकेश्वर पोलिस स्टेशन गाठून तक्रार दिली. पोलिसांनी अत्याचारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून विक्रम याचा शोध सुरू केला आहे.

# दोन मुलींचे अपहरण करुन गेस्ट हाऊसवर डांबून केला बलात्कार, दोघांना अटक




अलवर: राजस्थानमधील अलवर जिल्ह्यात संतापजनक घटना घडली आहे. दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण करून त्यांच्यावर बलात्कार करण्यात आला. ही घटना काल रात्री घडली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. दोन्ही पीडित मुलींना वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवले आहे. या घटनेचा तपास सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील भिवाडी येथील यूआयटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. भिवाडी डीएसपी हरिराम कुमावत यांनी सांगितले की, काल रात्री कारचालकाने दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण केले होते. या प्रकरणी फेज ३ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पीडितांपैकी एक मुलगी आरोपीच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घरी आली. तिने आपल्या कुटुंबीयांना सर्व हकिकत सांगितली. तिची मैत्रीण आरोपीच्या ताब्यात असल्याचे तिने सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीकडे विचारणा केली असता, तिने सांगितले की, एका कारमधून दोघे जण आले. त्यांनी दोघींना भिवाडीच्या एका गेस्ट हाऊसमध्ये नेले. तिथे दोघींवर बलात्कार केला. त्याच्या तावडीतून ती कशीबशी सुटून घरी आली. पोलिसांनी मुलीचा जबाब नोंदवून घेत, खबऱ्यांच्या माहितीवरून हरयाणाच्या माहेश्वरी गावाजवळून आरोपी कृष्ण कांत याला अटक केली. त्याची कारही जप्त केली आहे. या कारमध्ये दुसरी मुलगी होती. तिची सुटका केली आहे.

आरोपी कृष्णकांतची चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. दोन्ही मुलींना घेऊन भिवाडीच्या गेस्ट हाऊसमध्ये गेलो होतो. तिथे त्यांच्यावर बलात्कार केला. त्या मुलींना घेऊन दूर निघून जायचे होते, असे त्याने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून अन्य आरोपीलाही अटक केली आहे.

# कामावर ओरडल्याने सुरक्षारक्षकाची आत्महत्या?



अंबरनाथ येथील मातोश्री नगर या गृहसंकुलातील एका सात मजल्याच्या इमारतीवरून याच इमारतीत काम करणाऱ्या सुरक्षारक्षकाने आत्महत्या केल्याची घटना घडली. धक्कादायक बाब म्हणजे गृहसंकुलातील पाच सदस्यांकडून त्रास दिल्याचा आरोप चिठ्ठीमध्ये करत त्याने आत्महत्या केली आहे. या प्रकरणी सध्या अंबरनाथ पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद दाखल करण्यात आली असून, या प्रकरणी चौकशी केल्यानंतर पुढील कारवाई करणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.अंबरनाथ पश्चिम भागातील गावदेवी परिसरात मातोश्री नगर हे भव्य गृहसंकुल आहे. येथे सुरेश काचरू हे गेल्या १४ वर्षांपासून सुरक्षा रक्षकाचे काम करत होते. मात्र ३ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता याच गृहसंकुलातील एका इमारतीच्या सातव्या मजल्यावरून उडी मारून कचरू यांनी आत्महत्या केली. या आत्महत्येनंतर सुरक्षा रक्षकाजवळ एक सुसाइड नोट आढळली. यात याच इमारतीतील काही रहिवाशांकडून सुरेश यांना नाहक त्रास दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यात पाचही सदस्यांचा नावासहित उल्लेख केला आहे. मात्र या प्रकरणी सध्या अंबरनाथ पोलिस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यूची नोंद दाखल करण्यात आली आहे. तसेच, सुसाइड नोटमधील हस्ताक्षर आणि सुरक्षा रक्षकाच्या स्वाक्षरीचे हस्ताक्षर यात फरक असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सुरक्षा रक्षकाने आत्महत्या केली की सुसाइड नोट लिहून त्याला धक्का देत इतर सदस्यांना फसवण्याचा हा प्रकार आहे, याबाबत शंका उपस्थित होत आहे.

# 50 हजारांसाठी आईच लावून देणार होती लग्न; अल्पवयीन मुलीने केली पोलिसांत तक्रार



अमरावती: शिकण्याची इच्छा असताना सुद्धा फक्त ५० हजारांसाठी १५ वर्षीय मुलीवर बालविवाह करण्यासाठी दबाव टाकणाऱ्या आईविरोधात मुलीने थेट गाडगेनगर ठाण्यात धाव घेतली. माझी आई माझे जबरदस्तीने लग्न ठरवण्यासाठी निघाल्याची तक्रार तिने दिली. पोलिसांनीही मुलीच्या तक्रारीची दखल घेऊन आईविरुद्ध गुन्हा दाखल करून तिला तात्काळ अटक केली. हा धक्कादायक प्रकार शुक्रवारी गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत घडला आहे.

नियमानुसार लग्न करण्यासाठी मुलीचे वय किमान अठरा वर्षे आवश्यक आहे. मात्र, अजूनही काही ठिकाणी मुलींचे कमी वयात लग्न लावून दिले जाते. शहरातील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका गरीब कुटुंबातील मुलीचे तिची आई लग्न ठरवण्याच्या प्रयत्नात होती. मात्र, अवघ्या पंधरा वर्षीय मुलीनेच तिच्या आईविरोधात पोलिसांत तक्रार दिली. मुलगी नववीच्या वर्गात शिकते. तिला एक सहा वर्षांची बहीण व तेरा वर्षांचा लहान भाऊ आहे. तीन भावंडाना घेऊन या मुलीची ३८ वर्षीय आई राहते. दरम्यान, मागील एक महिन्यांपासून रहाटगाव येथे राहणारा दीपक अर्जुन सूर्यवंशी (वय २०) हा मुलीच्या घरी येत होता. मुलीसोबत लग्न करून द्या, असे त्याने मुलीच्या आईला सांगितले. हा सर्व प्रकार मुलीच्या डोळ्यांदेखत सुरू होता. यातच मुलीची आईसुद्धा लग्न लावून देण्यासाठी तयार झाली. माझे वय कमी आहे. तसेच मला शिकायचे आहे म्हणून तिने लग्नासाठी नकार दिला. मात्र, आईने आपल्याला समजून न घेता मारहाण केली, असे तिने तक्रारीत म्हटले आहे. शुक्रवारी सकाळी साडेदहा ते अकरा वाजेच्या सुमारास दीपक पुन्हा घरी आला व त्याने आईला ५० हजार रुपये देण्याचे सांगत तुमच्या मुलीसोबत लग्न लावून देण्याचा आग्रह केला. त्यामुळे आता लग्न पक्के होणार असे लक्षात येताच आपण गाडगेनगर पोलीस ठाणे गाठले.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898